वाचा:- संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ०५/ सन २०१६-१७, दि. १३.१०.२०१६

स्था.१८/ब/ ग्रा.पं ले.प.अहवाल निर्गमन / अे अे २/ न.क्र.१०८

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

**स्थायी आदेश क्र. ०३ /२०१७, दिनांक** - 3 FEB 2017

विषय:- ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत.

**प्रस्तावना:-**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४० नुसार ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण संपल्यानंतर दोन महिन्याचे आत लेखापरीक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींकडे पाठविणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण अहवाल बहुतांश लेखापरीक्षक संबंधित जिल्हा कार्यालयास विहित मुदतीत सादर करीत नसल्याने ते निर्गमित करण्यास विलंब होत असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव संचालनालयाने वाचा मधील आदेशान्वये " लेखापरीक्षकांनी एखादया महिन्यात पुर्ण केलेल्या ग्रामपंचायत घटकांपैकी ५० टक्के ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल पुढील महिन्याच्या ०१ किंवा ०२ तारखेस संबंधित जिल्हा कार्यालयाय सादर करणे अनिवार्य आहे. तसेच उर्वरीत ५० टक्के ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल त्यापुढील महिन्याच्या ०१ किंवा ०२ तारखेस कार्यालयास सादर करावेत " असे अवगत करण्यात आले आहे

उपरोक्त तरतुदीमुळे सर्व जिल्हा सहाय्यक संचालक यांनी ग्रामपंचायत लेखापरीक्षणास विलंब होत असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आणून दिल्याने सदर तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

**आदेश:-**

१. लेखापरीक्षकांनी एखादया महिन्यात पुर्ण केलेल्या ग्रामपंचायत घटकांपैकी २५ टक्के ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल पुढील महिन्याच्या ०१ किंवा ०२ तारखेस संबंधित जिल्हा कार्यालयास सादर करावेत. उर्वरीत ७५ टक्के ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल त्यापुढील महिन्याच्या ०१ किंवा ०२ तारखेस कार्यालयास सादर करावेत.

   उदा. 'अ' लेखापरीक्षकाने माहे जानेवारी २०१७ मध्ये २० ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण पुर्ण केल्यास माहे फेब्रुवारी २०१७ च्या ०१ किंवा ०२ तारखेस ५ ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल व उर्वरीत १५ ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल माहे मार्च २०१७ च्या ०१ किंवा ०२ तारखेस कार्यालयास सादर करावेत.

२. उपरोक्त प्रमाणे जे लेखापरीक्षक ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल जिल्हा कार्यालयास सादर करणार नाहीत, अशा लेखापरीक्षकांना जिल्हा सहाय्यक संचालक यांनी पुढील लेखापरीक्षणाचे कामकाज देऊ नये.

३. ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन दोन महिन्याच्या आत निर्गमित करण्याची जबाबदारी संबंधित लेखापरीक्षक व जिल्हा सहाय्यक संचालक यांची राहील.

४. ज्या ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण अहवाल लेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर दोन महिन्याच्या आत निर्गमित होणार नाहीत, त्यासाठी जबाबदार असलेल्यांविरुध्द विभागीय सह संचालक यांनी प्रशासकीय कारवाई करावी.

५. प्रस्तुत आदेशाद्वारे उपरोक्त वाचामधील आदेश क्र. ०५/२०१६-१७, दि. १३.१०.२०१६ अधिक्रमीत करण्यात येत आहे.

या आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल, याबाबत सर्व अधिनस्त कार्यालयांनी दक्षता घ्यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-

सर्व सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांना पुढील कार्यवाहीस्तव.

D/jayshree/vp letters /०२.०२.२०१७